आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

ऑगस्ट २०२५ - वार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पूरसदृश परिस्थिती, ७ जणांचा मृत्यू, १ लाख हेक्टर शेतीचं नुकसान

- मुख्यमंत्र्यांकडून परिस्थितीचा आढावा, नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश

- रालोआकडून उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दिल्लीला रवाना, प्रधानमंत्र्यांची घेतली सदिच्छा भेट

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६७६ अंकांची वाढ

**आणि**

- आशियाई नेमबाजी स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताला ४ पदकांची कमाई, कनिष्ठ गट १० मीटर एअर पिस्टलमधे कपिल बैंसलला सुवर्णपदक

**<><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस पडला. अनेक नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळं राज्यात काही ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागानं मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे घाट, सातारा घाट, रत्नागिरी, कोल्हापूर घाट या भागांना रेड अलर्ट तर, पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. समुद्र खवळलेला असून मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये, अशा सूचनाही दिल्या आहेत.

**मुंबई** आणि उपनगरात आज सकाळपासून जोरदार पाऊस झाला. सखल भाग जलमय झाले. उपनगरीय रेल्वे आणि रस्ते वाहतूकही मंदावली. चेंबूरमध्ये पडझड झाली तर मिठी नदीत एकजण वाहून गेला. हवामान विभागानं उद्या मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला असल्यानं मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व शाळा, महाविद्यालयांना महानगरपालिकेनं उद्या सुटी जाहीर केली आहे.

**ठाणे** शहरासह जिल्हाभर कालपासूनच जोरदार पाऊस झाला. जिल्हयातल्या शहापूर, कल्याण, भिवंडी आणि अंबरनाथसह इतर सखल भागात मोठया प्रमाणात पाणी साचलं. पावसामुळं ठाणे महानगरपालिका क्षेत्रातल्या शाळांना उद्या सुटी जाहीर करण्यात आली आहे.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज संपूर्ण राज्यातल्या पावसाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. नुकसान झालेल्या भागात पंचनामे करण्याचे आणि सर्व यंत्रणांना सतर्क राहायचे निर्देश त्यांनी दिले. गेल्या दोन दिवसांत पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांनी दिली. रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये जास्त पाऊस झाला असून तिथल्या नागरिकांनी पुढचे काही दिवस सतर्क राहावं, असं आवाहन त्यांनी केलं. अतिवृष्टीमुळे राज्याच्या विविध भागांत पिकांच्या झालेल्या नुकसानीबद्दल मुख्यमंत्री म्हणाले…

- **- होल्ड… बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस- - (३० सेकंद)**

- **<><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं नाव घोषित झाल्यानंतर ते आज दिल्लीला रवाना झाले. तिथं त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सदीच्छा भेट घेतली.

येत्या ९ सप्टेंबरला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना त्यांच्या मतचोरीविषयीच्या वक्तव्याबद्दल सात दिवसांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितलं आहे. या प्रतिज्ञापत्रासोबत गांधी यांनी पुरावे जोडावेत अन्यथा जाहीर माफी मागावी, असंही आयोगानं म्हटलं आहे. प्रतिज्ञापत्र सादर केलं नाही तर गांधी यांचे आरोप खोटे होते, असं मानलं जाईल, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली मतदार अधिकार यात्रा आज दुसऱ्या दिवशी बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यातल्या देव इथं पोहोचली. बिहारमधल्या

मतदार यादीत केल्या जाणाऱ्या विशेष पुनरिक्षण प्रक्रियेला विरोध करण्यासाठी मतदार अधिकार यात्रा काढली आहे. १६ दिवस चालणाऱ्या या यात्रेत इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. ही यात्रा २० हून अधिक जिल्ह्यांत जाणार असून १ सप्टेंबर रोजी पटना इथल्या गांधी मैदानात समारोप सभा होईल.

<><><><>

भारतीय शेअर बाजारात आज आठवड्याच्या सुरुवातीला वाढ पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज ६७६ अंकांनी वधारुन ८१ हजार २७४ अंकांवर बंद झाला. निफ्टी २४६ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ८७७ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्समध्ये नोंद असलेल्या ३० पैकी २० कंपन्यांचे समभाग आज वधारले. यात तंत्रज्ञान निर्मिती, सिमेंट कंपन्या तसंच, अर्थपुरवठा क्षेत्रात वाढ झाली.

<><><><>

कझाकिस्तानमधल्या शीमकेंत इथं सुरु असलेल्या एशियन शूटिंग चॅम्पिअनशिप स्पर्धेतच्या कनिष्ठ गटातल्या १० मीटर एअर पिस्तोल नेमबाजी प्रकारात हरियाणाच्या कपिल बैंसलनं आज सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेत भारताच्या जोनाथन गॅविननं कांस्यपदक पटकावलं असून कपिल, जोनाथन आणि विजय तोमर या संघानं सामूहिकरीत्या रजतपदकाला गवसणी घातली आहे.

या स्पर्धेतल्या ज्येष्ठ नेमबाजांच्या स्पर्धेत भारताच्या अनमोल जैन, आदित्य मार्ला आणि सौरभ चौधरी यांनी सांघिक रजतपदक पटकावलं आहे. या नेमबाजांनी केलेल्या दमदार कामगिरीच्या बळावर भारतानं या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी एकूण ४ पदकांची कमाई केली आहे. या स्पर्धेत कपिलनं पटकावलेलं सुवर्णपदक हे भारताला या स्पर्धेत मिळालेलं पहिलंच सुवर्णपदक आहे.

<><><><>

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आजही गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. राज्यसभेचं कामकाज सुरू होताच सभागृहाचे माजी सदस्य आणि नागालँडचे राज्यपाल ला गणेशन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर, बिहारच्या मतदार याद्या पुनरीक्षणाबाबत विविध राजकीय पक्षांकडून आलेले १९ स्थगन प्रस्ताव सभापतींनी फेटाळल्यावर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात

केली. त्यामुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरूवात झाल्यानंतर बंदरं, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी भारतीय बंदरं विधेयक २०२५ राज्यसभेत मांडलं, ते चर्चेनंतर संमत करण्यात आलं. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**लोकसभेतही** गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी जनविश्वास तरतुदी सुधारणा विधेयक २०२५ सभागृहासमोर मांडलं. ते निवड समितीकडे पाठवायचा प्रस्ताव सभागृहानं मंजूर केला. विरोधकांची घोषणाबाजी सुरूच राहिल्यामुळे कामकाज पुन्हा दुपारी दोन वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><>

देशातल्या बेरोजगारीच्या दरात जुलै महिन्यात किंचित घट होऊन तो ५ पूर्णांक २ दशांश टक्क्यांवर आला आहे. जून महिन्यात हा दर ५ पूर्णांक ६ दशांश टक्के इतका होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं आज जाहीर केलेल्या आकडेवारीत ही माहिती समोर आली. यात महिलांचा बेरोजगारीचा दर ५ पूर्णांक १ दशांश टक्के, तर पुरुषांचा दर ५ पूर्णांक ३ दशांश टक्के इतका आहे. ग्रामीण भागात बेरोजगारीचा दर ४ पूर्णांक ८ दशांश टक्के, तर शहरी भागात तो ६ पूर्णांक ८ दशांश टक्के इतका आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्याशी दूरध्वनीच्या माध्यमातून चर्चा केली. यावेळी पुतीन यांनी अलास्का इथं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी नुकत्याच झालेल्या भेटीच्या वृत्तांताचा गोषवारा सांगितल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे. पुतीन आणि ट्रम्प आणखी सविस्तर चर्चा करून रशिया-युक्रेन युद्धाबाबत तोडगा काढतील, अशी आशाही मोदी यांनी व्यक्त केली आहे.

<><><><>

भारत आणि चीन यांच्यातले द्विपक्षीय संबंध गेल्या काळात आलेला कठीण टप्पा ओलांडून पुढे गेले आहेत, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी

आज केलं. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. परस्पर आदर, संवेदनशीलता आणि सामायिक हित या तीन गोष्टींच्या आधारे दोन्ही देशांनी पुढे जावं, मतभेदांचं रुपांतर संघर्षात होऊ नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज नवी दिल्लीत पोहोचले. या भेटीदरम्यान ते भारत-चीन सीमाप्रश्नावरच्या विशेष प्रतिनिधी चर्चेच्या २४व्या फेरीत अजित डोवाल यांच्याबरोबर भाग घेतील.

//<><><><>//